


RNI NO. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

किंमत ४ रु/-

वर्ष २ रे | अंक ८८ वा | गुरुवार १५ ऑगस्ट २०२४ | पाने ४

Volume 1 | Issue 88 | Date : 15/08/2024 | blow : Thursday | Page 4 | Price 4

# स्वातंत्र्य उत्सवात सहभागी होणारे सर्व देशवासी हे आमचे कुटुंब

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नवी दिल्ली : बुधवार, १४ ऑगस्ट रोजी, ७८ व्या स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २० मिनिटे देशाला संबोधित केले. त्या म्हणाल्या, 'स्वातंत्र्य महोत्सवात सहभागी होणारे सर्व देशवासी हे आमचे कुटुंब आहेत.' राष्ट्रपती म्हणाल्या, स्वातंत्र्याचा हा सण आपल्याला त्या दिवसांची आठवण करून देतो, जेव्हा देशासाठी अनेकांनी बलिदान दिले होते. आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्याला एक नवीन अभिव्यक्ती दिली. सरदार पटेल, बोस, भगतसिंग, बाबासाहेब आंबेडकर असे अनेकजण होते, ज्यांच्या बलिदानाचे कौतुक केले जाते.

द्रौपदी मुर्मू या देशाच्या १५व्या राष्ट्रपती आहेत. या सर्वोच्च घटनात्मक पदावर पोहोचणाऱ्या त्या देशातील पहिल्या आदिवासी आणि दुसऱ्या महिला राष्ट्रपती आहेत. द्रौपदी मुर्मू वयाच्या ६४ व्या वर्षी (वर्ष २०२२) देशातील सर्वात तरुण राष्ट्रपती बनण्याचा विक्रमही त्यांनी केला.

द्रौपदी मुर्मू यांच्या भाषणातील ६ ठळक बाबी...

'सर्व देशवासीय सण साजरा करण्याच्या तयारीत आहेत. तिरंगा फडकतांना पाहून आपले हृदय उत्साहाने भरून येते. ते एका महान देशाचा भाग असल्याचा आनंद व्यक्त करते. आज, १४ ऑगस्ट रोजी, देश फाळणीचा स्मृती दिन साजरा करत आहे. लाखो लोकांना पलायन करावे लागले आणि अनेकांना प्राण गमवावे लागले. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले त्यांच्या पाठीशी आम्ही उभे आहोत.



'या वर्षी आपल्या देशात सार्वत्रिक निवडणुका झाल्या. ९० कोटी लोकांनी मतदान केले. मी मतदान करणाऱ्या मतदान कर्मचाऱ्यांचे आभार मानते. ज्यांनी अत्यंत उष्णतेत मतदान पार पाडले. भारत हा ८ टक्के विकास दराने वाढणारा देश आहे. पंतप्रधान गरीब अन्न कल्याण योजनेअंतर्गत ८० कोटी लोकांना मोफत धान्य दिले जात आहे. यावरून असे दिसून येते की, जे लोक गरिबीतून बाहेर आले आहेत, ते पुन्हा गरिबीत जाऊ नयेत याची आम्ही काळजी घेत आहोत.

'अलिकडच्या वर्षांत पायाभूत सुविधांना खूप चालना मिळाली आहे. सेमी कंडक्टरसारख्या गोष्टींना प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने अनेक गोष्टी केल्या आहेत. बँकिंग क्षेत्रात बरीच प्रगती झाली आहे. वेगवान प्रगतीमुळे भारताचा दर्जा उंचावला आहे. ऋ-२० च्या यशस्वी संघटनेनंतर ग्लोबल साऊथची संकल्पना अधिक बोलकी झाली आहे.। **पान २ वर**

## गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

**दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८**

## प्लास्टिकच्या राष्ट्रध्वज निर्मिती व विक्रिस बंदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाच्या गृह मंत्रलयाने दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजा करीता प्लास्टिकच्या वापरास मान्यता नाही. त्यामुळे प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजनिर्मितीस व विक्रिस मान्यता नाही. तसेच राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकून देवू नयेत. राष्ट्रध्वज खराब झाल्याचे आढळून आल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक असते. राष्ट्रध्वजाचा अवमान करणे व त्याची विटंबना होणे हे बोधचिन्ह व नांवे ( अनुचित वापरास प्रतिबंध) अधिनियम १९५० व राष्ट्रीय प्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम, १९७१ तसेच ध्वजसंहितेच्या तरतुदीनुसार दंडनीय अपराध आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील सर्व जनतेस १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या ७८ व्या समारंभ निमित्ताने शुभेच्छासह ध्वज संहितेच्या नियमाचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी कुंभार यांनी केले आहे.

## नवीन जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्य शासकीय ध्वजारोहण

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः भारताचा ७८ वा स्वातंत्र्य दिन समारंभ दिनानिमित्त गुरुवार दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ९ वाजून ५ मिनिटांनी जिल्हाधिकारी कार्यालय प्रांगण सात रस्ता सोलापूर येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी व जिल्हा प्रशासनातील अधिकारी कर्मचारी यांनी विहित वेळेपूर्वी राष्ट्रीय पोशाखात ध्वजारोहण समारंभासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांनी केले आहे.

# जिल्हास्तरीय पथकाकडून मौजे शिराळा-टेंभुर्णी येथील अवैध वाळू उत्खननांवर कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः गौण खनिजाच्या अवैध वाहतूक, उत्खनन व साठ्याच्या प्रकरणांत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६० मधील कलम ४८ (७) नुसार गौण खनिजाच्या बाजार मुल्याच्या पाच टक्यांपर्यंत दंडाच्या रकमेची परिगणना करून नियमानुसार स्वामित्वधन व दंडाची रक्कम वसुल करण्याची, तसेच कलम ४८ (८) नुसार अवैध उत्खननाकरीता वापरण्यात आलेली यंत्रसामुग्री व वाहतुकीकरिता वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्याची तरतुद आहे. यानुसार सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक व साठा प्रकरणांत कारवाई करण्याचे अनुषंगाने जिल्हा स्तरावर व तहसिल स्तरावर गठित करण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय समितीमध्ये उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांचा समावेश करण्यात आलेला आहे. जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मार्गदर्शनानुसार दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी जिल्हास्तरीय पथकाकडून मौजे शिराळा-टेंभुर्णी ता.माढा येथील अवैध वाळू उत्खनन चालू असल्याचे प्राप्त गोपनीय माहितीवरून त्या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये साधारण १३१.९ ब्रास वाळू साठा जप्त करण्यात येऊन, संबंधित अवैध वाळू उत्खनन करून साठा करण्यावर तहसिलदार माढा यांचेस्तरावरून दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यात अवैध गौण खनिजाच्या विविध प्रकरणांत एप्रिल २०२४ ते जुलै २०२४ अखेर पर्यंत केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक व उत्खननच्या आढळून आलेल्या एकुण प्रकरणे १२३ आहेत. सदर प्रकरणांत एकुण रक्कत रुपये ७८.९३ कोटी दंड आकारण्यात आलेला आहे. सदर दंडात्मक कारवाई व्यतीरिक्त फौजदारी कारवाईमध्ये वरील नमुद कालावधीत एकुण २८ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या विविध प्रकरणांत वापर करण्यात आलेले एकुण १६ वाहने इतर ३ यंत्रसामग्री जप्त करण्यात आलेली आहेत

# जलशक्ती अभियानातून सोलापूर जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत : राकेश कुमार मीना




**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्रीय जलशक्ती अभियानाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात जलसंधारणाचे विविध कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी अत्यंत कृतिशील आराखडा तयार करावा. ग्राम पातळीवरील सर्व यंत्रणा, शालेय विद्यार्थी, नागरिक व शेतकरी यांच्या पर्यंत या अभियानाचे महत्त्व पटवून द्यावे. प्रत्येक ठिकाणी जलसंधारणाची अत्यंत दर्जेदार कामे करून सोलापूर जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केंद्रीय जलशक्ती अभियानाचे नोडल अधिकारी राकेश कुमार मीना यांनी केले.। **पान २ वर**

# लढतो आणि भिडतो तोच पत्रकार असतो : वसंत मुंडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

बीड / येरमाळा : 'लढण्याची आणि थेट भिडण्याची क्षमता असणारी व्यक्तीच पत्रकार होते,' असे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी बुधवारी (दि. १४) बीड येथे स्पष्ट केले. 'राज्यात पत्रकार आणि वृत्तपत्र विक्रेते यांची किमान पाच लाखांची मतपेढी आहे. त्यांची मते फिरविण्याची क्षमताही लक्षात घ्या,' असेही मुंडे यांनी सूचकपणे सांगितले.

महाराष्ट्रातील पत्रकारांच्या न्याय्य मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी दीक्षाभूमी (नागपूर) ते मंत्रालय (मुंबई) अशी चार हजार किलोमीटरची पत्रकार संवाद यात्रा सुरू आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेच्या या यात्रेचा दुसरा टप्पा सुरू आहे. यात्रेत बुधवारी बीड व येरमाळा (जि. धाराशिव) येथे पत्रकारांशी संवाद साधण्यात आला.बीड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये झालेल्या कार्यक्रमात श्री. वसंत मुंडे म्हणाले, ''आम्ही ठरवले, तर काय करू शकतो हे दाखवून देण्याची वेळ सरकारने कृपया आणू नये. कोणत्या सरकारने कोणत्या अर्थसंकल्पामध्ये पत्रकारांसाठी एका नव्या पैशाची तरी तरतूद केली का, हे सांगावे. या क्षेत्रात चाललेली वेठबिगारी पुरोगामी महाराष्ट्राला शोभणारी नाही.''

**ग्रामीण माध्यमवस्था सक्षम करण्यासाठीच यात्रा**

येरमाळा येथे विद्यानिकेतन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पत्रकार संवाद मेळावा झाला. श्री. वसंत मुंडे म्हणाले की, ग्रामीण भागात राहून माध्यमांसाठी काम करणाऱ्यांना कोणत्याच सोयी-सवलती मिळत नाहीत. ही व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठीच पत्रकार संवाद यात्रा काढण्यात आली आहे.न्याय मिळत नाही, म्हणून सर्वसामान्य माणूस पत्रकारांकडे येतो. त्यातील अनेक प्रश्न सुटतात. याच पत्रकारांवर उपासमारीची वेळ आली आहे. प्रश्न सुटणार नसतील तर पत्रकारांना मतांची ताकद दाखवावी लागेल असा इशाराही श्री. मुंडे यांनी दिला.कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे कळंब तालुकाध्यक्ष अशोक शिंदे, बाळासाहेब जाधवर, सचिन बारकुल, दत्ता बारकुल, दीपक बारकुल, सचिन पाटील, संतोष बारकुल, सुधीर लोमटे, तानाजी बारकुल आदी उपस्थित होते. येडेश्र्वरी देवीचे दर्शन घेऊन पत्रकार संवाद यात्रा तुळजापूर येथे रवाना झाली.

# नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसील कार्यालयाचे काम अंतिम टप्प्यात

## आता नळदुर्ग शहराला दररोज पाणी मिळणार : राणा पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : बोरी धरणाचं वरदान लाभलेल्या ऐतिहासिक नळदुर्ग शहरात अपुऱ्या होणाऱ्या साठवण टाकी मुळे नळदुर्ग कराना खुप मोठा त्रास अनेक वर्षांपासून सहन करावा लागत आहे , नळदुर्ग शहराच्या विकासासाठी आणि शहरातले मूलभूत प्रश्न सोडविण्या साठी यामध्ये प्रामुख्याने पिण्याचा प्रश्न नागरिकांना भेडसावत होता परंतू हा प्रश्न सोडविण्यासाठी निखळ दूरदृष्टी ठेवून प्रामाणिक पणे तुळजापूर तालुक्याचे लोकप्रिय विकासरत्न आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी हा पाणी प्रश्न मात्र खूप चिकाटीने आणि जिद्दीने कायम स्वरूपी मार्गी लावला आहे .नळदुर्ग शहरातल्या सर्व्हे न २९ मध्ये गेली ६० ते ७० वर्षापासून शासकीय जागेवरती राहत असलेल्या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे व पक्के घर मिळावे यासाठी काही लाभार्थ्यांना भोगवटदार म्हणून ८ अ चे ५ दाखले आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या हस्ते वितरण करण्यात आले आहे त्यामुळे लाभार्थ्यां मध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे नळदुर्ग शहरातील ऐतिहासिक किल्ल्याचे पर्यटन वाढीसाठी किल्ल्याचे संवर्धन करणे आजच्या काळाची गरज आहे यासाठी याचा ही पाठपुरावा आम्ही करत आहोत




तुळजापूर तालुक्याची लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या अथक प्रयत्नातून नळदुर्ग शहरातील नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध व्हावे याकरिता त्यांनी केलेल्या सातत्याच्या पाठ पुराव्या मुळे नळदुर्ग शहरासाठी ४३ कोटी रुपयेच्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ करण्यात आला

नळदुर्ग शहरासाठी खूप मोठी स्वाभिमानाची आणि बाब असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे हा शुभारंभ नळदुर्ग शहरात वसंत नगर येथे १ लाख ८५००० लिटरची टाकी , हुतात्मा स्मारक उद्यान ८५००० लिटरची टाकी अक्कलकोट रोड १ लाख ६५ हजार लिटरची टाकी जलशुद्धीकरण केंद्र ३ लाख २५ हजार लिटर क्षमता असलेले जलकुंभ उभारणार तर उपजिल्हा रुग्णालय येथे ३ लाख १५००० लिटरची टाकी नळदुर्ग नगरपालिकेच्या जवळ ६ लाख ३५ हजार लिटरची टाकी तर डॉ आंबेडकर नगर समाज मंदिराच्या समोर १ लाख ६५ हजार लिटरची टाकी असून या पिण्याच्या पाणी टाक्या तात्काळ उभारणार आसुन

या टाक्याची कामे ही दर्जेदार झाली पाहिजेत यांची खबरदारी सर्वांनी घेतली पाहिजे आसे परखड मत तुळजापूर तालुक्यातील लोकप्रिय आमदार राणा जगजितसिंह पाटील । **पान २ वर**

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय

### इतकी गरज आहे.

चांगला माणूस होण्यासाठी दुसरा पर्याय नाही. अवचित प्रसंगी मित्र-मैत्रिणी खचून जाऊ शकतात. तेव्हा त्यांना साथ द्या. कठीण प्रसंगात एकमेकांची साथ सोडू नका. समाजात वावरताना कान आणि डोळे नेहमी उघडे ठेवा. त्यासाठी समाजभान जागृत ठेवण्याचा सल्ला प्रसिद्ध अभिनेता सुमित राघवन यांनी दिला आहे. संवेदना, सामाजिक बांधिलकी, सहवेदना, सहचर्य, मदतीची भावना ही माणसाची काही वैशिष्ट्ये. तथापि त्यांची वीण विसविशीत होत चालल्याचे अनुभव समाज घेतो. अलीकडच्या काळात अशा घटनांमध्ये वाढ होत चालल्याचे आढळते. समाजात घडणाऱ्या अनेक अनावस्था आणि कटू प्रसंगांमध्ये अनेक लोक 'बघ्याची' भूमिका घेताना आढळतात. अपघात घडतात. त्यातील जखमी मदतीच्या प्रतीक्षेत असतात. रस्त्यावर मारामाऱ्या होतात. मुलींची छेड काढली जाते. प्रेमप्रकरणातून त्यांच्यावर हल्ल्याच्या घटना घडतात. अशा प्रसंगांमध्ये क्वचितच माणसे मदतीला धाव घेताना आढळतात. त्याऐवजी प्रसंगाचे मोबाइलवर चित्रीकरण करण्यात मात्र आघाडीवर दिसतात. सामान्य माणसे मदतीला धाव का घेत नसावीत? त्याचीही काही कारणे असू शकतील का? प्रसंग अपघाताचा असला तरी न्यायालयाच्या किंवा पोलीस स्थानकांच्या चकरा माराव्या लागतील, मारामाऱ्या सोडवायला गेले किंवा छेड काढणाऱ्यांना हटकले तर मध्यस्थी करणाऱ्यालाचे मारहाण होऊ शकेल, अशी भीती सामान्य माणसांना वाटते. तशा घटना घडल्याही आहेत. पण विरोध करायला एक जरी व्यक्ती पुढे आली तर त्याची साथ द्यायला पुढे येण्याची हिंमत माणसांमध्ये येऊ शकते, हे काही प्रसंगांनी अधोरेखित केले आहे. सामाजिक मदतीच्या गरजेची वेळ प्रत्येकावर कधी ना कधी येते. अशावेळी आजूबाजूच्या णसांनी मदतीसाठी धाव घ्यावी, अशी सर्वांचीच अपेक्षा असते. तथापि मदतीची सुरुवात स्वतः पासून करणे आवश्यक आहे याचा मात्र माणसांना विसर पडला असावा का? मला काय त्याचे, अशी अलिप्ततेची किंवा मदतीसंदर्भात भीतीचीच भावना प्रत्येकाच्या मनात असली तर मदतीसाठी कोण धावेल, याचाही विचार केला जाऊ शकेल का? अन्यथा मदतीला कोणीच पुढे येत नाही असा दोषारोप होतच राहील. सामाजिक वेदना जाणवण्यासाठी प्रत्येकाने चांगला माणूस होणे गरजेचे आहे, हेच राघवन यांना सुचवायचे असावे. ज्याची समाजाला कधी नव्हे इतकी गरज आहे.

# माझा राष्ट्रवाद :माझी स्वातंत्र्य श्रद्धा

जैविक प्राप्त जीवन ही एक अनमोल गोष्ट आहे ,पण राष्ट्रप्राप्त जीवन ही सुद्धा एक न्याय आणि संघर्षाची निरंतर निर्मानाची गोष्ट आहे. मी ज्या देशात जन्मलो त्या देशाचा मला अभिमान आहे. मला या देशाच्या सर्व ज्ञान परंपरा संमिश्रता याचा वारसा आहे .मला या देशाने समृद्ध व बहिष्कृतही केले आहे. अशा या देशाच्या आकलनाचा मी विचार कसा करतो? मला देश आणि देश प्रेम समजते का? या देशाबद्दल माझी कर्तव्य कोणती आहेत? देशाची व्यापक व्याख्या मी कधीतरी समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे का? देश म्हणजे भूगोल नाही. देश म्हणजे नकाशा नाही .देश म्हणजे धर्म नाही. देश म्हणजे निव्वळ भाषा नाही .देश म्हणजे देव देवळांचा पसारा नाही. देश म्हणजे बहुविविधता ही ही निश्रि्चत नाही, मग या देशाचे माझे आकलन नेमके कोणते आहे?

हा माझा देश मला काय? नवे संचित स्वीकारा म्हणून सांगत असतो. इतिहासाच्या अनाकलनीय अज्ञानाच्या प्रदेशात जा असे सांगत असतो का? देश मला कधी कधी जगणे नाकारतो का? माझ्या या जगण्याची उपेक्षाच करीत असतो का?. या देशातल्या सगळ्या समस्या म्हणजे माझा देश आहे, पण या समस्यांच्या मधील माझी कृतीशीलता ही माझी देशा प्रतीची कर्तव्यनिष्ठ आहे. हे मला जास्त महत्वाचे म्हणून कळते का? व्यक्तिगत ही देशातील सार्वजनिक जीवनाचा एक मूल्य भाव आहे .व्यक्तिगत यश हे देशाच्या व्यवस्थेने बहाल केलेली एक न्यायिक बाब आहे ते इतरांनी माझ्या बद्दल केलेले वर्तन आहे. तो निर्णय आहे .तो न्याय आहे. असा सदोदित न्याय मला माझ्या व्यक्तिगत जीवनात प्राप्त करण्यासाठी काय करावे लागेल? ते मी करेन का? मी तो करतो आहे का? असा प्रश्र्न मला सतत पडला पाहिजे. देश म्हणजे देशातील असंख्य प्रश्र्नांची उत्तरे शोधणारी माझ्यासारखी असंख्य ऊर्जावान व्यक्तिमत्व होत.देश म्हणजे रंग अभिमान नव्हे. देश म्हणजे श्रीमंतीचा उन्माद नव्हे. देश म्हणजे भाषेचा केवळ अभिमान नव्हे. देश म्हणजे जातीचा झंजावात व संघर्षाचा दहशतवाद नव्हे. देश म्हणजे निष्क्रियवाद दैववाद यांचा सतत पसारा नव्हे .देश म्हणजे माझी माणसे, माझी माती, माझी निष्ठा, माझी कर्तव्य पुर्तता, करीत राहणे म्हणजे माझा देश शोधत राहणे होय. देश ही मूल्य अनुभूती आहे. देश हा मानव्याचा अनुभव आहे देश हा संमिश्र संस्कृतीचा आविष्कार आहे. देश हा इतरांच्या प्रती समाआदर आहे.देश म्हणजे जातीय व्यवस्था नव्हे. देश म्हणजे सरंजामी इतिहासाचे अवशेष नव्हेत. देश म्हणजे भौगोलिक मालकी नव्हे .देश म्हणजे मठ मंदिर चर्च यांची अनामिक ओढ नव्हे. देश म्हणजे यात्रा आणि जत्राही नव्हेत. याहून देश असतो. आपल्या प्रत्येक कृतीच्या निष्ठावान भूमिकेत जो अनुभव येतो तिथे देश असतो .आपल्या कृतीची एक वाक्यता त्यातील नियमपुर्वकता त्यासाठीची कर्तव्यनिष्ठा होय . यांचा निरंतर ध्यास घेऊन पुढे जात राहणे .हे देश निर्माण करणे असते. ही देशाची विश्र्लेषण पुरवक केलेली व्याख्या नेहमी अपूर्ण असणार आहे. या प्रत्येक कृतीतून साकारणारा राष्ट्रवाद हा पुन्हा एकदा बुद्धी आणि कर्तव्य आकलन आणि आत्मविश्र्वास यांच्या आधारे साकारत असतो ,आणि म्हणून माझा राष्ट्रवाद ही एक माझ्या नैतिक मूल्यांच्या स्वीकाराची सतत उन्नत होत राहणारे अशी गोष्ट असते.

मला प्राप्त झालेले जीवन या भूभागावर झाले आहे. इथल्या माती हवा पाणी जंगल यावर माझे प्रेम आहे . इ थल्या डोंगरदर्यांनी माझा श्र्वास संपन्न होतो आहे .इथल्या असंख्य माणसांच्या स्वार्थाचा आणि संघर्षाचा मी बळी आहे, पण तरीही मी या सर्वांचा आहे या सर्व व्यवस्थेत मी अनिश्र्चेने जगत असलो, तरीही मला या व्यवस्थेच्या प्रती स्वयं अस्मिता आणि आत्मविश्र्वास बाळगूनच वाटचाल करावी लागते. करावयाची आहे. ही व्यवस्था उ पेक्षा करते. ही व्यवस्था आपल्या श्रममुल्याचे शोषण करते. ही व्यवस्था योगदान मान्य करत नाही. ही व्यवस्था सहजासहजी न्याय देत नाही. ही व्यवस्था व्यक्ती प्रतिष्ठा मान्य करत नाही. ही व्यवस्था निरपेक्ष नाही. ही वंश जात, धर्म, अभिप्रेत व्यवस्था आहे. या व्यवस्थेत जगताना आपले वर्तन वंश जात धर्मनिरपेक्ष अशा असले पाहिजे, तसे वर्तन करीत वाटचाल करत राहणे. हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. या व्यवस्थेत प्रभुत्व सत्ता आहे. हे या व्यवस्थेचे गुणधर्म आहेत. सरंजामी व्यवस्था, राजेशाही धर्मशाही ईश्र्वर शाही जर्जर व्यवस्था पसरली आहे या व्यवस्थेत रमायचे का? याचा मला सतत विचार करून वर्तन करावे लागते आहे. या व्यवस्थेच्या बाहेर येऊन धैर्यवान जगायचे याचा विचार करीत करीत माझा राष्ट्रवाद विकसित झाला. माझा राष्ट्रवाद हा सांस्कृतिक राष्ट्रवाद नाही हा ऐतिहासिक पुनर्जीवन वाद नाही. हा निर्मम शोषणाचा सहकार वाद नाही. माझा राष्ट्रवाद हा शिक्षण सम्राट वाद नाही माझा राष्ट्रवाद हा इतिहासाचा व्रता अभिमान नाही. निष्करण शोकवाद ही नाही. माझा राष्ट्रवाद या सर्व समस्यांच्या आकलनातून सम्यक भूमिका घेत, मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेचा व्यक्तिगत आणि सामूहिक करावयाचा प्रयत्न वाद आहे. माझ्या राष्ट्रवादात संविधान वाद हा अग्रभागी आहे मानवी हक्काची सर्व मूल्य प्रस्थापित करणे. यासाठीचे योगदान देणे. हाच माझ्या राष्ट्रवादाचा साधासुधा अर्थ आहे माझ्या राष्ट्रवा दाचे. हेच आकलन वाद आहे माझा राष्ट्रवाद आहिंसक आहे माझा राष्ट्रवाद हा सर्वांच्या सहभागासह अथक जीवन जगण्याचा प्रयत्नवाद आहे माझा राष्ट्रवाद इतरांना शत्रु मानणारा नाही .माझ्या राष्ट्रवाद स्वतःच इतरांना शत्रू ठरवून गृहीत अशी भविष्याची वाटचाल नाही .माझ्या राष्ट्रवादात वर्णवाद नाही वंशवाद नाही. माझ्या राष्ट्रवादात इतिहासाचे अपराधी भान नाही. मन नाही.माझ्या राष्ट्रवादात इतिहासातील चुकांचे हिशोब चुकते करण्याचा किंचित ही विचार नाही .माझ्या राष्ट्रवादां त सार्वत्रिक मानव्याच्या प्रस्थापनाचे सदोदित प्रयत्न आहेत. त्यासाठीच्या नजीकच्या इतिहास परंपरा शोधण्याचा आणि त्याच्याशी जोडून जगण्याचा प्रयत्न आहे. माझा राष्ट्रवाद हा वर्तमानातील व्यवस्थेला दिलेल्या आव्हान आहे माझा राष्ट्रवाद हा वर्तमानातील खलनायकांना दिलेल्या आव्हान आहे, त्यांना विचारलेले प्रश्र्न आहेत माझा राष्ट्रवाद हा शोषणाच्या विरुद्धचा बुलंद आवाज आहे माझा राष्ट्रवाद व्यवस्था सार्वजनिक हिताची असलीच पाहिजे तिचे संचालन पारदर्शक आणि गतिमान असलेच पाहिजे यासाठी त्यावर सतर्क भान ठेवण्याचे आपले कर्तव्य असले पाहिजे. आपला व्हिजिलन्स असला पाहिजे असा हा माझा राष्ट्रवाद आहे. माझा राष्ट्रवाद हा संविधानाच्या राष्ट्रीय न्यायग्रंथात असलेल्या मूल्यांचा उद्घोषणा वाद आहे तसाच तो मूल्य प्रस्थापनेसाठीचा संघर्ष ही आहे.

माझ्या राष्ट्रवाद ही शोध आणि बोध घेत पुढे जाऊ पाहणारी ज्ञानात्मक कृती आहे. माझ्या राष्ट्रवादात नवनवीन ज्ञानभान आहे कला संस्कृतीचा शोध आहे सृजनाचा सतत प्रयत्न आहे. माझ्या राष्ट्रवादात जैविक नात्यांचा समादर आहेच पण त्यांच्या प्रतिक्र्तव्याची निष्ठा कृतीतून जगण्याचा प्रयत्न आहे. माझा राष्ट्रवाद शोषण विरहित आहे. माझा राष्ट्रवाद हा प्रभुत्ववादाच्या विरोधात आहे स्वयंवर्तन हे मालक व्यवस्था संचालक असे न करता स्वयं शिस्तीचे आणि आत्मपरीक्षणाचे वर्तन हा माझ्या राष्ट्रवादीचा विवेक आहे. हा प्रयत्न ही निरंतर माझ्या राष्ट्रवादाची साक्ष असते. सजग वृत्ती असते ती कृतीच असते. माझा राष्ट्रवाद हा निसर्गाचा संवर्धन प्रयत्न असतो . माझा राष्ट्रवाद हा निसर्गाची अ परिमित लूट आणि निसर्गाचा नाश होऊ नये यासाठी प्रतिरोधकाची भूमिका असते. माझ्या राष्ट्रवादीमध्ये विचार साक्षरतेचे सतत भान असते माझ्या राष्ट्रवादात नव्या सृजनाचा प्रयत्न असतो नव्या कल्पना नव्याविष्कार यामध्ये अनुभूतीचा आनंद शोधणे हा माझा राष्ट्रवादाचा वैयक्तिक अन्वयार्थ आहे माझा राष्ट्रवादही व्यवस्थेशी सतत एकरूप वर्तनाची प्रक्रिया असते त्यात काही वेळा उनिवाही असतात, त्यामध्ये स्वयंम नेनिवांचा उद्रेकही असतो, पण त्यावर नियंत्रणाचा सातत्यपूर्ण कठोर प्रयत्न असतो . वर्णाअधिष्ठीत व्यवस्थेला अभिप्रेत असलेल्या वर्गीकरणात आपण समाविष्ट होता कामा नये. याचेच जाती विहीन भान आहे. आपल्याला निरपेक्ष जगण्यासाठी बंदिस्त व्यवस्थेला आव्हान देण्याचे सतत भान असले पाहिजे. हाच माझ्या राष्ट्रवादां चा अर्थ शोधणे .हा स्वयं-राष्ट्रवाद होय . ती सांस्कृतिक धार्मिक ऊन वादात जगत नाही ना हेच राष्ट्र निर्माण असे प्रारंभिक पाऊल असते निर्मम शोषण निर्मम अत्याचार हे नाहीसे करणे हे राष्ट्रवादाचे प्रारंभिक प्रत्येकाचे कर्तव्य असल्या पाहिजे इतरांना जगण्याचा अधिकार आहे सर्वांच्या जगण्याचा सामूहिक सार्वभौम विचार आणि प्रयत्न करणे ती व्यवस्था प्रस्थापित करणे त्यात न्यायाची अह म भूमिका प्रस्थापित करणे. हेच व्यक्ति व्यक्ति पातळीवर राष्ट्रवादाचे आकलन प्रस्थापित झाले पाहिजे.

साम्राज्यवाद्यांच्या विरुद्धचा लढणारा बेहोशी राष्ट्रवाद हा जागतिक पातळीवर आवश्यक ही जरी असला तरी तो आण्विक संकटांच्या पातळीवर टिकणार नाही एक वंश एक भाषा एक धर्म एक जात एक ग्रंथ एक ईश्र्वर असा राष्ट्रवाद ही वगळणारी इतरांना जीवन नाकारणारी राष्ट्रवादाची कृतक कल्पना स्वीकारता कामा नये. ही कितीही आवश्यक वाटली तरीही त्यामध्ये आंतरिक शत्रुत्व आणि अत्याचार याची परिसीमा यातून गाठली जाईल म्हणून हा सांस्कृतिक राष्ट्रवाद त्याज्य केला पाहिजे .इतिहासाच्या कृतक कल्पना आणि वारसा यांच्या आधारे रचला जाणारा राष्ट्रवाद हा इतिहासातून संघर्षाचीच नवी रचना करत राहतो असाही राष्ट्रवाद नाकारण्याचे ज्ञानभान प्रत्येक नागरिकाला प्राप्त झाले पाहिजे. माझा राष्ट्रवाद हा एकात्म आहे माझा राष्ट्रवाद हा भाषिक संवर्धनाचा प्रयत्न आहे माझा राष्ट्रवाद यह वाद आहे इतके न्यायिक भान स्वतः बाळगावी सतत असे प्रयत्नरत राहावे या प्रयत्नाच्या मधूनच व्यक्ती जीवन हे यशस्वी होते आणि राष्ट्राच्या प्रती आपली कर्तव्यनिष्ठा बाळगल्याचा सार्थ अभिमान अनुभवता येतो. याही पलीकडे जाऊन असे म्हणता येते की व्यवस्थेचे समस्या विश्र्लेषण आणि व्यवस्थेच्या समस्यांच्या निर्मूलनासाठीचा कृतिशील सहभाग हाच राष्ट्रवादीचा राष्ट्रभक्तीचा अन्वयार्थ आहे हा भारतात ज्ञानसाक्षरतेतूनच पुढे गेला पाहिजे हा उपदेश नाही. हे आकलन आहे हा जीवन जगण्याच्या आत्मविश्र्वासातून साकारलेला विचार आहे.

इथल्या व्यवस्था आपला स्वतःचा राष्ट्रवाद घराण्यांचा गौरव घराण्यांचा इतिहास इतिहासातील शूरवीर कथा यांचे उदात्तीकरण असा राष्ट्रवाद जनमनांच्या मध्ये रुजणे घातक आहे. इथे धर्मवाद्यांचा राष्ट्रवाद हा ही धर्म ही सर्वश्रेष्ठ अंतिम व जगण्यास उपयुक्त असलेली सर्वश्रेष्ठ गोष्ट आहे. असे लादण्याचे प्रयत्न चालू आहेत .हा धर्मराष्ट्रवाद हा भारतीय संविधानाच्या मूलभूत तत्वाच्या विरोधी असल्याने धर्मराष्ट्रवाद हा आपला राष्ट्रवाद नाही आपला धर्मनिरपेक्ष वर्तनवाद श्रदावाद हा विवेक वादाचा पाया असला पाहिजे असा राष्ट्रवाद प्रस्थापित करणे हे आपले कर्तव्य आहे .माझा राष्ट्रवाद हा स्वयम् जातीय सुधारकांचा अनुनयवाद नाही. जहाल पंथीयांच्या विचाराची बेहोशी नाही. माझा राष्ट्रवाद हा न्यूडगंड वाद नाही .दुसऱ्या बाजूला माझा राष्ट्रवाद हा अतिरेकी व्रथाभिमानवादी नाही .याचे सम्यक प्राप्त करीत पुढे वाटचाल करणे हा माझ्या राष्ट्रवादाचा साधा आणि सोपा अन्वयार्थ आहे..

मुळात राष्ट्र ही एक आदर्श प्रतीक कल्पना आणि उद्दिष्ट पूर्तता असते. अनेक नव्या मिथक कल्पना त्या त्या कालखंडात मानव जात तयार करते त्यातील आधुनिक कालखंडातील राष्ट्रही स्वायत्त सार्वभौम जगण्याची शपथ त्या भूभागातील नागरिकांनी घेतलेली असते. म्हणून ते राष्ट्र साकारते राष्ट्राच्या या निर्माण उद्दिष्टाला अनेक सापेक्ष अर्थ प्राप्त करून दिलेल्या असतात परंतु राष्ट्रही नवी मूल्य स्वीकारणारी बदलणारी अशी गोष्ट सतत राहते जीवनाच्या व्यापक पसार्यात मानवतेच्या निरंतर संघर्षात स्वतः प्रत्येक जनसमुहाणे निर्धारित केलेल्या सीमारेषा या राष्ट्रांच्या अंतर्गत सुरक्षिततेच्या बाबी ठरतात, आणि म्हणूनच राष्ट्र ही वंशिक धार्मिक भौगोलिक त्याच्या पलीकडे नव्या मूल्या भानाची आणि सृजनची गोष्ट संवेदनेची संक्रमण शीलता निर्माण झाली पाहिजे. मानव्य करुणा ही सुद्धा राष्ट्र ज्ञानभानाची आधुनिक मूल्य आता रुजू लागली आहे, आणि म्हणून व्यक्तीचेव निरेश्र्वर जीवन वृत्ती त्यांचा यहवादी जीवनाचा शोध त्याचा अनुभव आणि प्रतिकां ना प्रमाणभूत मानून जीवन जगणारा बहुसंख्याक समाज हा प्रवास असाच चालत राहणार आहे. म्हणून राष्ट्रवाद ही एक प्रतिकांची नशा नाही राष्ट्रवाद ही प्रतीकांची फसवणूक नाही राष्ट्रवाद निव्वळ इतिहासाचा सांस्कृतिक टोकाचा उच्छादनुमाध नव्हे. एकूणच व्यक्तीचे प्रत्येक जगणे हे किती सजग न्याय्यि आत्मविश्र्वासपूर्वक आणि सार्वजनिक तेथे सर्वोच्च भान ठेवून होत राहते, यामधूनच राष्ट्रवाद साकारतोआहे हा सामूहिक राष्ट्रवाद हा वर्तमानकालीन राष्ट्रवाद भारताला आज अत्यंत आवश्यक आहे. नव्या राष्ट्रवादाचे नवे भान प्रत्येक भारतीय बांधव समजावून घेत वर्तन करेल तीच राष्ट्रवादाची सामर्थ्यशीलता सिद्ध होत राहील पुढे जात राहील. म्हणूनच राष्ट्रवाद जागतिकीकरणाच्या उत्तरकाळात क्रोनी कॅपिटल इजमच्या शोषण काळात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या डीएनए सॉफ्टवेअरच्या आणि जेनेटिक डाटा या संकटाच्या आगामी काळात नेहमी बदलत राहणार आहे राष्ट्रवादां च्या व्याख्या नवे करणारे मन आणि नवी वर्तन करणारी मनगटे मानव जातीची तयार होणे हीच आजची गरज आहे हाच माझ्या राष्ट्रवादाचा अर्थ आहे थोडक्यात माया राष्ट्रवाद असा विकसित होणे आवश्यक आहे हीच आंतरिक प्रार्थना आहे.

टीप - हे विश्र्लेषण अनेकांच्या असहमतीच् स्वातंत्र्य मान्य करीत आहे.

**शिवाजी राऊत,**

पान १ वरुन

## नळदुर्ग येथे अतिरिक्त तहसील

यांनी व्यक्त केले .

नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गनलं जातं या शहरात आणि शहरातल्या परिसरातल्या नागरिकांना त्यांच्या हाताला काम मिळावे म्हणून होर्टी शिवारामध्ये एम आय डी सी होण्याच्या मार्गावर आहे शिवाय नळदुर्ग येथील मराठवाडा मुक्ती संग्राम स्मारकाचे काम हाती घेण्यात आले आहे शहरांमध्ये नवीन रस्त्या साठी ९३ कोटी रुपयेची कामे हाती घेतले आहेत . सर्वात महत्त्वाची योजना माझी लाडकी बहीण योजना ही कायमस्वरूपी असून प्रत्येक बहिणीला महिन्याला दीड हजार रुपये येणारच नळदुर्ग शहरांमध्ये समृद्धी व विविध योजना आणण्या साठी माझ्या माय माऊलीने माझ्या मोठ्या भावाने माझ्या दादाने माझ्या डोक्यावर दोन्ही हात ठेवावे भरभरून आशिर्वाद द्यावा हीच आपल्या कडुन आपेक्षा करतो .कार्यक्रमाचे अध्यक्ष रणजीतसिंह ठाकुर हे होते तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक नळदुर्ग नगरीची माजी नगरसेवक विनायक अहंकारी यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुनील बनसोडे यांनी केले . कार्यक्रमासाठी ड दीपक आलुरे ,भाजपाचे नेते सुशांत भूमकर , माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश सोनटक्के नळदुर्ग नगरीचे माजी प्रभारी नगराध्यक्ष नय्यर जाहागीरदार , ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुहास येडगे तानाजी जाधव दादासाहेब बनसोडे उत्तम बनजगोळ भगवंत सुरवसे श्रीनिवास भोसले शिवाजी नाईक अजित चव्हाण ,माजी नगरसेवक सुधीर भैया हजारे बसवराज धरणे माजी नगरसेवक संजय बताले सामाजिक कार्यकर्ते बंडू पुदाले , सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव माजी नगरसेवक निरंजन राठोड भाजपाचे शहराध्यक्ष धिमाजी घुगे भाजपाचे बबन चौधरी , भाजपाचे नेते नंदगाव चे माजी सरपंच सिद्धू कोरे ,नळदुर्ग विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे माजी चेअरमन दत्तात्रय कोरे , श्रमिक पोतदार लहुजी शक्ती सेनेचे शिवाजी गायकवाड ,योगेश सुरवसे , अमित बनसोडे , उत्तम कांबळे भाजपाचे बापू दुरुगकर सचिन बनसोडे प्रकाश बनसोडे प्रभावती सुरवसे हजारो नागरिक यावेळी उपस्थित होते .

## जलशक्ती अभियानातून सोलापूर जिल्हा

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत श्री. मीना मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, कृषि उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा परिषद जलसंधारण अधिकारी पारसे. एस. एस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. नाईकवाडी, सोलापूर महानगर पालिकेचे डंके, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती रुपाली भावसार यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नोडल अधिकारी श्री. मीना पुढे म्हणाले की, जलशक्ती अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्याच्या विविध भागात झालेल्या कामांची पाहणी केली. ही सर्व कामे अत्यंत चांगल्या पद्धतीने झालेली असून याच पद्धतीने जनशक्ती अभियानाअंतर्गत कृती आराखडा करत असताना कामे घ्यावीत. अमृत सरोवर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात झालेले काम खूप चांगले असून या अंतर्गत ७५ पेक्षा अधिक सरोवरात दुरुस्ती करून त्याची पाणी साठवण क्षमता वाढवली तसेच ते सरोवर पुन्हा जिवंत करण्याचे काम जलसंधारण विभागाने केलेले आहे, हे अत्यंत कौतुकास्पद काम असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात विविध ठिकाणी स्पॉट व्हिजिट करून जलसंधारणाचे कामे आराखड्यात घेत असताना ती तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य असली पाहिजेत याची खात्री करावी यासाठी जपानच्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. या अभियानाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे प्रस्तावित करून ती कामे अत्यंत चांगल्या पद्धतीने होण्यासाठी जलसंधारण विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे नियोजन करावे व सोलापूर जिल्हा पाणीटंचाई मधून बाहेर पडून जलयुक्त जिल्हा होईल यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन श्री. मीना यांनी केले. तसेच या अभियानाचे अधिक गतिमान पद्धतीने अंमलबजावणी होण्यासाठी महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर घ्यावा. व जलशक्ती से नारीशक्ती तक हे अभियानाचे असलेले ब्रीदवाक्य अगदी सार्थ ठरेल असे त्यांनी म्हटले. यावेळी केंद्रीय तांत्रिक अधिकारी श्रीमती पुर्णिमा बाराहते यांनीही सोलापूर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या विशेषतः अमृत सरोवर योजनेत झालेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले.

प्रारंभी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांनी जिल्ह्यात जलसंधारण विभागाच्या विविध शाखा मार्फत करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली. तर कृषी उपसंचालक राजकुमार मोरे यांनी कृषी विभागाच्या वतीने जलसंधारण मध्ये करण्यात येत असलेल्या कामांची माहिती विशद केली.

## स्वातंत्र्य उत्सवात सहभागी

बीआर आंबेडकरांचे हे विधान आपण लक्षात ठेवले पाहिजे. राजकीय लोकशाहीचे रूपांतर सामाजिक लोकशाहीत केले पाहिजे. मतभेदाला प्रोत्साहन देण्याची प्रवृत्ती नाकारलीच पाहिजे असे माझे ठाम मत आहे. सरकारने सर्व घटकांच्या कल्याणासाठी अनेक पावले उचलली आहेत.

'नारी शक्ती कायदा महिलांचे सक्षमीकरण दर्शवतो. मी तुम्हा सर्वांना विनंती करते की तुम्ही तुमच्या जीवनात छोटे-मोठे बदल करा आणि हवामान बदल थांबवण्यासाठी हातभार लावा. आम्ही अनेक वसाहती काळातील कायदे काढून टाकले आहेत. आपल्या न्याय व्यवस्थेचा उद्देश फक्त शिक्षा देणे नाही. मी याकडे आपल्या स्वातंत्र्यसैनिकांना दिलेली श्रद्धांजली म्हणून पाहते.

'अलिकडच्या वर्षांत, अवकाश क्षेत्रात अभूतपूर्व प्रगती झाली आहे. आपण सर्वजण गगनयानाची वाट पाहत आहोत. भारतीय अंतराळवीरांना अंतराळात नेले जाईल. नुकत्याच पार पडलेल्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारतीय संघाने उत्कृष्ट प्रयत्न केले. भारताने टी-२० विश्र्वचषक जिंकला. बुद्धिबळात अनेक खेळाडूंनी देशाला गौरव मिळवून दिले आहे. बॅडमिंटनसह अनेक खेळांमध्ये खेळाडू प्रेरणा देत आहेत.

**सुविचार**

**"संघर्षाचा काळ हा एकट्यानेच लढावा लागतो. बाकी चांगल्या काळात तर, न ओळखणारे सुद्धा ओळख दाखवतात".**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# महसूल खात्यातील २७ वर्षे सेवा पूर्ण करुन संजय सोनटक्के यांचा सेवानिवृत्ती वाढदिवस साजरा करुन संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तहसील कार्यालयात मुख्य लिपीक व नागणसूर मंडल अधिकारी संजय सोनटक्के हे दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी आपल्या प्रदीर्घ २७ वर्षाच्या अखंड सेवेनंतर निवृत्त झाले. यानिमित्ताने मंगळवारी अक्कलकोट येथील सर्जेराव जाधव सभागृह येथे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर, नगरसेवक मिलन दादा कल्याणशेट्टी, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्र्वस्त अमोलराजे भोसले, राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील बंडगर, रिपाइंचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडिखांबे, श्री स्वामी समर्थ देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांचे चिरंजीव प्रथमेश इंगळे, उबाठा शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, मनोज निकम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला. सेवानिवृत्त झाल्याबद्दल संजय सोनटक्के यांचा तहसीलदार विनायक मगर यांच्या शुभहस्ते फेटा, शाल, हार, पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. सोनटक्के हे एक लोकाभिमुख महसूल विभागातील कर्मचारी तथा कास्ट्राईब कर्मचारी संघटनेचे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून एक लोकाभिमुख आणि निष्कलंक कर्मचारी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर येथे पुरवठा विभागातही सेवा केली. तसेच सोलापूर, अक्कलकोट तहसील कार्यालयात त्यांनी सेवा बजावली. कनिष्ठ लिपक ते मंडळ अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांनी कर्मचाऱ्यांची संघटना असलेल्या कष्ट्राईब संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष म्हणून देखील जवाबदारी सांभाळली आहे. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त मंगळवारी अक्कलकोट येथील सर्जेराव जाधव सभागृह येथे सेवानिवृत्त व वाढदिवसाच्या निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने अमोलराजे भोसले, श्री स्वामी समर्थ देवस्थान समितीच्या वतीने प्रथमेश इंगळे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीने अक्कलकोट तालुका अध्यक्ष अविनाश मडीखांबे, राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने सुनिल दादा बंडगर, दत्तात्रय माडकर आदींनी सोनटक्के यांचा सत्कार केला. यावेळी नगरसेवक बाळा शिंदे,

वासू कडबगवकर,पिंटू सोनटक्के, रणजीत गोंडळ,वैभव नवले, गोटू माने, प्रविण घाटगे,बाळासाहेब घाटगे,शिवराज जमगे,गणेश कांदे, वाजीद बिराजदार,साजित बिराजदार,दर्शन आहेरवाडी,अनिकेत सोनटक्के,गणेश सोनटक्के,रिपाइं तालुका उपाध्यक्ष प्रकाश गडगडे,दिपक कांबळे,रमेश सावंत,नृदिन मुजावर , सुभाष गडसिंग,बाबा निंबाळकर, धनंजय गडदे,अक्षय आळंद,अविनाश माडकर,संजय मानकर, राहूल बिराजदार,आदी उपस्थित होते.

# सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देणे साठी महाराष्ट्र शासन कृषि विभाग मार्फत दि.२९ जुलै २०२४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. या अर्थसहाय्याचे वितरण शेतकऱ्यांना सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीद्वारे शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यामध्ये थेट लाभ हस्तांतरणाच्या डीबीटी माध्यमातून होणार आहे. सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना २ हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टर ५ हजार रूपयांचे अर्थसहाय्य देण्याची घोषणा शासनाने केली आहे. त्याची अंमलबजावणी सोलापूर जिल्ह्यामध्ये सुरू झालेली आहे. ज्या शेतकऱ्यांनी खरीप २०२३ मध्ये ई-पीक पाहणी द्वारे आपल्या पिकाची नोंद केलेली आहे, त्या शेतकऱ्यांना सदरचे अनुदान मिळणार आहे. अर्थसहाय्य आधार लिंक खात्यावर जमा करण्यासाठी सध्या शेतकऱ्यांची माहिती घेण्याचे काम कृषि विभागामार्फत सुरू आहे. कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांच्या याद्या प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत स्तरावर तसेच विविध प्रसार माध्यमांवर प्रसिध्द करण्यात येत आहेत. या याद्यांमध्ये सोयाबीन व कापूर पिकांच्या वैयक्तिक व सामाजिक मालकी असलेल्या शेतकऱ्यांचया याद्यांचा समावेश आहे.

*सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना लाभ किती मिळणार- ०.२ हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १ हजार रूपये, ०.२ हेक्टर पेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रतिहेक्टर रूपये ५ हजार (२ हेक्टरच्या मर्यादेत म्हणजेच रू.१० हजार पर्यंत).

*शेतकऱ्यांनी काय करणे अपेक्षित आहे- शेतकऱ्यांनी कृषि विभागाच्या वतीने देण्यात आलेले संमती पत्र भरून देणे अपेक्षित आहे, आधार अधिनियम २०१६ नुसार आपल्या आधार क्रमांकाचा वापर ओळख पटवण्यासाठी आवश्यक आहे, संमती पत्रामध्ये आपले आधार वरील असलेले नाव, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक मराठी व इंग्रजी मध्ये देणे अपेक्षित आहे. चूक होऊ नये यासाठी या संमती पत्राबरोबर आपल्या आधारची झेरॉक्स कृषी सहायकांना देण्यात यावी, दिनांक १४ ऑगस्ट २०२४ पर्यंत शेतकरी बांधवांनी आपली माहिती आपल्या गावाचे कृषी सहाय्यक किंवा कृषी पर्यवेक्षक यांच्याकडे जमा करावी, ज्या क्षेत्रावर सामायिक खातेदार आहेत. त्यापैकी एकाच खातेदाराच्या आधार लिंक असलेल्या बँक खात्यावर अनुदान जमा होणार आहे. इतर खातेदारांची ना हरकत पत्र सोबत जोडणे अपेक्षित आहे. त्यामुळे शेतकरी बांधवांनी सामायिक खातेदाराच्या बाबतीत ज्यांचे नावे अनुदान जमा करावयाचे आहे त्या एकाच खातेदाराचे नाव देऊन इतर खातेदारांनी ना हरकत प्रमाणपत्रावर सही करणे गरजेचे आहे. सदरचे संमती पत्र तसेच सामायिक खातेदारांचे ना हरकत पत्र शेतकऱ्यांनी आपल्या गावच्या कृषी सहायकांकडे जमा करावे. शेतकऱ्यांकडून प्राप्त झालेले संमती पत्र व ना हरकत पत्र तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये संकलित करून शासनाने महाआयटी कडून तयार केलेल्या वेब पोर्टलवर शंतकऱ्यांची माहिती भरली जाणार आहे. या पोर्टलच्या माध्यमातून वैयक्तिक व सामायिक खातेदारांच्या अनुदानाच्या अर्थसहाय्याची परिगणना करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी आपल्या गावचे कृषी सहाय्यक, कृषी पर्यवेक्षक, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क करावा. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी ब्युरो ऑफ सिव्हिल एविशन सिक्युरिटी अधिकाऱ्यांची भेट घेतली



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः होटगी रोड येथील विमानतळाची सुरक्षा व्यवस्थेची पाहणी करण्यासाठी नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोचे अधिकारी दिनांक १३ व १४ ऑगस्ट रोजी सोलापूर येथे दाखल झालेले आहेत. ते विमानतळावरील सुरक्षेच्या दृष्टिकोनातून असलेल्या विविध बाबीची अत्यंत बारकाईने तपासणी करत असून सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्यांना काही त्रुटी निदर्शनास आलेल्या असून त्याची पूर्तता करण्यासाठी विमानतळ प्राधिकरणाला सुचित करण्यात आलेले आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर विमानतळाची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोचे अधिकारी यांच्याशी विमानतळाच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून असलेल्या विविध बाबीवर चर्चा केली. येथील विमानतळावरून नागरी विमान सेवा सुरू करण्यासाठी जिल्हा प्रशासन व विमानतळ प्राधिकरण करत असलेल्या कामकाजाची माहिती त्यांनी दिली. यावेळी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम. राजकुमार, सोलापूर विमानतळ प्राधिकरणाचे चॅम्पला बनोथ व महापालिकेचे अधिकारीही उपस्थित होते.

ब्युरो ऑफ सिविल एव्हिजन सिक्युरिटी (नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरो) च्या अधिकाऱ्यांनी होटगी रोड सोलापूर विमानतळाची सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विविध पातळीवर अत्यंत काटेकोरपणे तपासणी केली. यावेळी सुरक्षा विरोच्या अधिकाऱ्यांना सोलापूर विमानतळ प्राधिकरणा कडून सुरक्षेच्या दृष्टीने काही किरकोळ बाबी राहिलेल्या असून त्याची पूर्तता करण्याबाबत त्यांनी निर्देशित केलेले आहे. विमानतळ प्राधिकरण कडून सुरक्षेच्या बाबीची पूर्तता केल्यानंतर पुन्हा ब्युरो ऑफ सिविल एव्हिएशन सिक्युरिटी चे अधिकारी तपासणीसाठी येणार आहेत.

त्यानंतर डीसीएएस चे अधिकारी तपासणीसाठी विमानतळाला भेट देतील त्यांची पाहणी झाल्यानंतर त्यांच्या कडून प्रमाणपत्र मिळेल व त्यानंतर सोलापूर विमानतळ येथून विमानसेवा सुरू होण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे.

# दुधनीतील बौध्द समाजासाठी राखीव स्मशानभूमीच्या प्रश्न लवकर मिटवावे : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/प्रतिनिधीः दुधनी येथील बौध्द समाजासाठी राखीव असलेल्या स्मशानभूमी जागेच्या प्रश्र्न लवकरात लवकर मिटवण्यासाठी यावे.अशी मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी श्री कुमार आशीर्वाद व उपविभागीय(प्रांत)अधिकारी सोलापूर रिपाइं(आठवले गट)चे जिल्हा उपाध्यक्ष श्री सैदप्पा झळकी यांनी दिली आहे. दुधनी येथील गट



क्रं.३६०च्या स्मशानभूमी जागेचा ७/१२ उतार्यावर नोंद आहे. पण त्यावर भूसंपादनाचे काम चालु आहे म्हणून नमूद केली आहे. दुधनी येथील भीमनगर आणि बुध्दनगर च्या बौध्द समाजाच्या रहिवाशियांसाठी स्मशानभूमी गट क्रं.३६० मध्ये नमूद असलेल्या क्षेत्र ०.२० आर भूसंपादनाचे काम चालु आहे. असे नमूद आहे. तरी ही जागा आमच्या बौध्द समाजासाठी आहे.आणि पूर्वीपासून आमच्याच बौध्द समाजाची दपन व दहन येथेच करण्यात येत आहे.तरी ही जागेत दपन किंवा दहन करण्यासाठी मूलभूत सुविधा अभावी अडचणी होत आहे.याला मुख्य कारण स्वतंत्र ७/१२ उतारा मिळत नसल्याने येथे रस्ते,लाईट,दहनशेड्ड व पाण्यासह ईतर मूलभूत सोय करण्यासाठी स्वतंत्र ७/१२ उतारा नसल्याने अडचण होत आहे. मूलभूत सुविधा नसल्याने येथील लोकांच्या विशेषता महिला व ज्येष्ठ नागरिकांच्या खूप त्रास होत आहे. तरी या सर्व मूलभूत सुविधा पुरवण्यासाठी मुख्य अडचणी जागेची आहे. या जागेचे समस्या निवारण करण्यासाठी या पूर्वी मा.जिल्हा अधिकारी व मा.उपविभागीय अधिकारी कार्यालया कडे विनंती अर्ज दि.०४/०६/२००७,२१/०९/२०११,१३/१२/२०१३,२६/१०२०१६ आणी ०८/०१/२०१८ रोजी दिली होती. त्यावेळी गाव कामगार तलाटी व मंडळ अधिकारी यांनी स्थानिक चौकशी करुन घेतली तसे अहवालही प्रांताधिकारी कार्यालयास पाठवले आहे.तरी आपल्या कार्यालयाची स्पष्ठ अभिप्राय किंवा आदेश आता पर्यंत आली नाही.

तरी कृपया करुन आपण जातीने लक्ष घालून सदर जागेची स्वतंत्र ७/१२ उतारा मिळावे.अन्यथा येथील नागरीकांना घेवून रिपाइं च्या वतीने आंदोलन करावे लागेल.अशा इशाराही यावेळी श्री सैदप्पा झळकी यांनी दिली आहे.आणी सदर निवेदनाचे प्रति मा.ना.रामदास आठवले सामाजिक न्याय राज्यमंत्री भारत सरकार,मा.ना.एकनथ शिंदे मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना माहीती साठी पाठवले असल्याचेही निवेदनात नमूद केली आहे.

# सैनिक टाकळी चे आजी सैनिक विनायक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते श्री छत्रपती शिवाजी हायस्कूलमध्ये ध्वजारोहण करण्याचा मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सैनिक टाकळी/संजय चव्हाण : हर घर तिरंगा मोहिमे अंतर्गत शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या चीन सीमेवरती कार्यरत असलेले नायब सुभेदार श्री. विनायक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते सैनिक टाकळी येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल या विद्यालयात ध्वजारोहण करण्याचा मान शाळेने आपल्या माजी विद्यार्थ्याला दिला. विनायक पाटील सतरा व्या वर्षी भरती झाल्यानंतर




वयाच्या ३६ व्या वर्षी नायब सुबेदार बनले आहेत. ते आपल्या युनिटचे एक उत्कृष्ट शारीरिक प्रशिक्षण प्रशिक्षक, शस्त्र प्रशिक्षण प्रशिक्षक, मोटर लाँचर या शस्त्राचे प्रशिक्षक, भारताच्या शांती सेनेमधून साऊथ आफ्रिका मध्ये सुद्धा कार्य करण्याची त्यांना संधी मिळाली होती. मागील वर्षी चीन सीमा रेषेजवळ असणाऱ्या गावांमध्ये आर्मी सद्भावना या मोहिमेचे त्यांनी नेतृत्व केले आहे. याच विद्यालयात शिकून इतकी मोठी झेप घेणाऱ्या व मातृभूमीसाठी सध्या चीन बॉर्डर वरती मायनस २० डिग्री तापमानामध्ये तैनात असलेल्या या सैनिकास शाळेने घर घर तिरंगा याप्रसंगी झेंडावंदनाचा मान देऊन सर्व सैनिकांच्या प्रति अभिमान व्यक्त केला आहे. सैनिकांचा मान उंचावला आहे. यावेळी त्यांनी एनसीसी चे विद्यार्थी व एनसीसीचे प्रशिक्षक उदय पाटील सर यांना १५ ऑगस्ट संचलना विषयी आपल्याकडे असणाऱ्या ज्ञानाविषयी बरीच माहिती दिली व एनसीसी विद्यार्थ्यांना स्वतः परेडचे संचलन मध्ये भाग घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

# सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अर्थसहाय्य मिळण्याबाबत रासपची तहसीलदारांकडे मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

अक्कलकोट/ प्रतिनिधी : सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरसकट अर्थसहाय्य मिळण्याबाबत अक्कलकोटचे निवासी नायब तहसीलदार विकास पवार यांना राष्ट्रीय समाज पक्षाचे पश्र्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष सुनील दादा बंडगर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले. यावेळी अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष दाजी कोळेकर, शहर युवक आघाडीचे

अध्यक्ष निलेश लवटे, संतोष सोलंकर, सतीश बिराजदार, दत्ताराम भांगे, बाबू शिकलगार, गणेश कांदे शिवा जमगे, प्रसाद मुकडे, साईनाथ फुलारे, शिवाजी खांडेकर, रवी बजंत्री आदी उपस्थित होते.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत शासनाचा निर्णय झाला आहे. परंतु यामध्ये अट अशी आहे की ज्या शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी सातबारा उताऱ्यावर आहे त्यांनाच हेक्टरी पाच हजार रुपये अनुदान मिळणार आहे. यामुळे ज्या शेतकऱ्यांनी गेल्या वर्षी ई पीक पाहणी केली आहे परंतु काही कारणास्तव ऑनलाईन झाले नसल्याने बऱ्याच शेतकऱ्यांवर अन्याय होणार आहे. तरी शासनाने सरसकट शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार अनुदान देण्यात यावे अशी मागणी राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे.

# आत्मकला संस्थेतर्फे शोभीवंत वनस्पतींचे प्रदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सोलापूर/प्रतिनिधीः आत्मकला बहुउद्देशीय संशोधन संस्था व लीली नर्सरी यांच्यावतीने वृक्षप्रेमींसाठी दुर्मीळ शोभीवंत वनस्पतींचे प्रदर्शन १५ ते १९ ऑगस्ट दरम्यान आयोजित करण्यात आल्याची माहिती संयोजक त्रिभुवन जयंतराव जक्कल यांनी दिली. विविध रंगीबेरंगी फुलझाडे, पानांची रचना, आकर्षक रंगसंगतीची पाने तसेच नासाने प्रमाणित केलेल्या घरातील हवा शुध्द करणाऱ्या कमी पाण्यावर जगणाऱ्या अनेक वनस्पती जसे संस्वेरिया, फर्न, पिस लिली, मनी प्लान्ट, स्पायडर प्लान्ट, झामिया कुल्कस, एग्लोनेमा अशा अनेक नवीन वनस्पती पाहावयास मिळतील. वृक्षप्रेमींना वृक्ष संगोपनाविषयी विशेष मार्गदर्शन देखील प्रदर्शनात केले जाणार आहे. हे प्रदर्शन सकाळी दहा ते रात्री आठ या वेळेत समाचार भवन, शुक्रवार पेठ समाचार चौक सोलापूर येथे पाहावयास (निःशुल्क) मिळणार असल्याचे संयोजक जक्कल यांनी सांगितले.




# कासेगाव येथे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उदघाटन

## लोकरत्न कै.श्रीकांत (बप्पा) वाडकर यांच्या ६५ व्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

**सकाळी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास रक्तदात्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रक्तदान शिबिराचे उद्घाटन लेबर फेडरेशनचे अध्यक्ष श्री शंकर चौगुले यांनी केले. श्री दिलीप चौगुले, श्री असलम तांबोळी, श्री निशिकांत पाटील, श्री. सरकार पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. ७६ रक्तदात्यांनी रक्तदानाचे पवित्र कार्य पार पाडले.**



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

द.सोलापूर/प्रतिनिधी: कासेगावचे लोकप्रिय माजी सरपंच तथा माजी पंचायत समिती सदस्य लोकरत्न कै. श्रीकांत (बप्पा) वाडकर यांच्या ६५ व्या जयंतीचे औचित्य साधून कासेगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अक्कलकोट विधानसभेचे लोकप्रिय आमदार माननीय सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. गावात अनेक ठिकाणी उद्घाटन झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सभेचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम आमदार सचिनदादांच्या हस्ते हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज व लोकरत्न कै. श्रीकांत बाप्पा वाडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर उपस्थित असणाऱ्या कासेगाव व पंचक्रोशीतील अनेक गावातून आलेल्या मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. माजी तंटामुक्त समिती अध्यक्ष श्री. निशिकांत पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कासेगावचे सरपंच श्री. यशपाल (भैय्या) वाडकर यांनी आपल्या मनोगतात कासेगावसाठी दिलेल्या भरघोस निधीबद्दल आमदार साहेबांचे आभार मानले व आगामी विकास कामांसाठी मागण्यांचे निवेदन केले. सत्काराला उत्तर देताना आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी कासेगावकडे विशेष लक्ष देऊन मागण्या पूर्ण करण्याचे आश्र्वासन दिले. रस्ते, इमारती, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, सिंचन आदी विविध विभागाच्या मिळून तब्बल १० कोटी रुपयांच्या कामांचे उदघाटन यावेळी करण्यात आले. तसेच आगामी निविदाप्रक्रियेत असणाऱ्या २० कोटी रुपयांच्या कामांची घोषणा करण्यात आली. आभार प्रदर्शन ग्रामपंचायत सदस्य भरत जाधव यांनी तर सूत्रसंचालन श्री ज्ञानेश्र्वर कदम यांनी केले. व्यसपीठावर सिद्धाराम हेले, श्रीमंत हक्के, मधुकर चिवरे, सिताराम कदम, नेताजी खंडागळे, बालाजी कवडे, प्रशांत जाधव, आबा भागवत, भारत चीवरे, मनोज गुंड, वैभव हलसगे, दत्तात्रय खंडागळे, बब्रुवान खंडागळे, ज्ञानेश्र्वर रोकडे, राजाराम चौगुले, नेताजी पाटील, मल्लिनाथ येणगुरे, लक्ष्मण वाडकर, संभाजी चौगुले, प्रकाश हेडे, जालिंदर गायकवाड, शाहाजन शेख, नारायण जाधव, केदार ढेकळे, राजश्री येणगुरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी कासेगाव व परिसरातील शेकडो नागरिक उपस्थित होते. यावेळी लहुजी शक्ती चौक येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन आमदार साहेबांच्या हस्ते करण्यात आले.

# उंदरगाव येथे पहिल्यांदाच 'खेळ पैठणीचा' कार्यक्रम अत्यंत उत्साहात संपन्न झाला

## अभिजीत पाटलांच्या पुढाकारांना माढा तालुक्यातील उंदरगाव येथे नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त खेळ पैठणीचा कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

पंढरपूर/प्रतिनिधी: श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांनी माढा तालुक्यात माढा तालुक्यातील अनेक गावांमध्ये आपला जनसंपर्क वाढवण्यामध्ये जंगजंग बांधला असून अभिजीत पाटील हे गावोगावी मोठ्या प्रमाणामध्ये कार्यक्रम घेत अभिजीत पाटील आपला संपर्क वाढवत असताना दिसत आहेत.

विठ्ठल प्रतिष्ठान आयोजित नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त अभिजीत आबा पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये उंदरगाव येथील अभिजीत पाटील यांच्या सहकाऱ्यांनी उत्कृष्ट कार्यक्रमाचे नियोजन केले असता सुप्रसिद्ध निवेदिका मोनिका जाजु यांच्या उत्कृष्ट संयोजनातून दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलाविण्याचा हेतू सफल झाला. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावे या अनुषंगाने हा कार्यक्रम आयोजन करण्यात आला होता. यावेळी भाऊसाहेब महाडिक-देशमुख, ऋषिकेश काका तांबिले, उपसरपंच समाधान मस्के, संजय बापू तांबिले, आबासाहेब साठे, नंदकिशोर आरे, मगन नाईकवारे, सुधीर लवटे, सुरज कांबळे, वाय.जी. भोसले, ग्रामपंचायत सदस्य केवड अमोल धर्मे यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.




माढा मतदारसंघ कायम राजकारण्याच्या बाबतीमध्ये महाराष्ट्रामध्ये चर्चेत ठरलेला दिसून येतो मात्र विकासाच्या बाबतीत माढा तालुक्यामध्ये अधोगती दिसून आलेली आहे. येथील महिला, तरुण तसेच हजारो बेरोजगार तरुणांच्या हाताला काम व त्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी आपण कायम काम करणार आहे. आज खेळ पैठणीच्या कार्यक्रमातून हजारो माय-माऊलींच्या चेहऱ्यावरचा आनंद मनाला समाधान देणारा होते. येथील माता-भगिनींनी उस्फूर्त प्रतिसाद देत खेळांमध्ये सहभाग नोंदविल्याबद्दल आभार व्यक्त केले. **– अभिजीत पाटील,चेअरमन**

# 'अहिल्यारत्न पुरस्कार' अंकिता पाटील ठाकरे यांना प्रदान, सामाजिक कार्याबद्दल गौरव

## अंकिता पाटील ठाकरे यांना 'अहिल्यारत्न पुरस्कार' प्रदान, सामाजिक, शैक्षणिक कार्याबद्दल सन्मान



**दैनिक यश सिद्धी न्यूज**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः हिंदू समाज व मल्हार क्लब बारामती यांच्या वतीने पुण्यश्र्लोक लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथी निमित्त दिला जाणार 'अहिल्यारत्न पुरस्कार' २०२४ हा पुरस्कार जिल्हा परिषदेच्या सदस्या, भाजप युवा मोर्चाच्या जिल्हा अध्यक्षा अंकिता पाटील ठाकरे यांना प्रदान करण्यात आला. यामुळे त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. हा सोहळा बारामती येथील नटराज नाट्य कला मंदिर येथे संपन्न झाला.

सामाजिक बांधिलकी म्हणून काम करत असलेल्या व्यक्तींचा गौरव या कार्यक्रमात करण्यात आला. यामध्ये अंकिता पाटील ठाकरे यांचे सामाजिक योगदान बघून हा गौरव करण्यात आला आहे. भाजपाचे राष्ट्रीय नेते, माय होम इंडियाचे संस्थापक अध्यक्ष सुनील देवधर, विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे, पुणे ग्रामीण भाजपा जिल्हाध्यक्षा वासुदेवनाना काळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी अंकिता पाटील ठाकरे म्हणाल्या की, हा एक मोठा सन्मान असून, यामुळे येणाऱ्या काळात देखील समाजसेवेचे काम करण्यासाठी एक वेगळीच उर्जा मिळणार आहे. पिढ्यांनपिढ्या समाजसेवेचे हे व्रत आजही अखंड सुरू आहे. आणि हे पुढेही सुरूच राहणार आहे. आपल्या समाजरत्नांनी जी शिकवण आपल्याला दिली आहे, तीच आपल्याला येणाऱ्या पिढीला देखील देयची आहे, ते आपलं कर्तव्य आहे. यामुळे ते आपल्याला चोखपणे पार पाडायचं आहे.

या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन ॲड. गोविंद देवकाते, सकल हिंदू समाज व मल्हार क्लब बारामती यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता.

# ध्येय निश्चित करून मेहनत घेतल्यास यश निश्र्चित मिळते : कृष्णाजी भगत यांचे प्रतिपादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

सिन्नर /सोमनाथ गिरी : विद्यार्थ्यांनी ध्येय निश्र्चित करून कठोर मेहनत घेतल्यास यश निश्र्चित मिळते.दानशूर व्यक्तींनी केलेल्या दानांतून एक अतिशय चांगला व स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला आहे.विद्यार्थ्यांनी चांगला अभ्यास करून संस्था ,गाव व शाळेचे नाव उज्ज्वल करावे असे आवाहन मविप्र संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत यांनी केले. डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी गणवेश व शालेय दप्तर वाटपप्रसंगी ते बोलत होते.भगत पुढे म्हणाले की,कर्मवीरांनी लावलेल्या छोटयाशा वृक्षाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. संस्था विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी विविध उपक्रम राबवित असते.गावातील दानशूर व्यक्तींनी केलेल्या मदतीमुळे च शाळेची इमारत उभी आहे.

व्यासपीठावर मविप्र संस्थेचे संचालक कृष्णाजी भगत,शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने,शालेय समितीचे सदस्य दामोदर कुंदे,वसंतराव जाधव, माजी सरपंच शरद माळी, रामनाथ पावसे,पालक- शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे,अर्चना ढोली, चित्राताई

पडवळ मुख्याध्यापक रामदास वाजे आदी उपस्थित होते. दीपप्रज्वलन करून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीदेवी व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते विद्यालयातील गरीब व




होतकरू विद्यार्थ्यांना मोफत शालेय गणवेश व दप्तराचे वाटप करण्यात आले.मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी आपल्या प्रास्ताविकात विविध शालेय उपक्रम तसेच भविष्यात राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देवून उपस्थितांचे स्वागत केले. विद्यालयाच्या वतीने संचालक कृष्णाजी भगत तसेच येथील श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे पतसंस्थेला दीपस्तंभ पुरस्कार मिळाल्याबदल नारायण वाजे यांचा सत्कार करण्यात आला.

विद्यालयातील सर्व शिक्षक,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल वामने, अभियंता भालचंद्र वारुंगसे,संदेश वाजे,महेश वारुंगसे व त्यांचे मित्रमंडळ आदींच्या वतीने ७५ शालेय गणवेश तसेच दानशूर माजी विद्यार्थी अनिल आव्हाड, उद्योजक बंटी कटारिया ,अतुल अग्रवाल दातृत्वातून ५० शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. शालेय गणवेश व दप्तर मिळविण्यासाठी विद्यालयाचे उपक्रमशील विज्ञान शिक्षक पी.आर.करपे व विद्यालयाचे कर्तव्यदक्ष मुख्याध्यापक रामदास वाजे यांनी परिश्रम घेतले.दरवर्षी मदतीचा हात हा उपक्रम राबविण्यात येतो.

विद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी रवि गोजरे व किशोर शिंदे यांनी विद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांना आई किंवा वडील नाही ४० विद्यार्थ्यांचा आरोग्य विमा काढला आहे. या सर्व उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शालेय सांस्कृतिक समितीचे प्रमुख पी.आर.करपे यांनी तर आभार सुषमा थोरात यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सुनिल ससाणे,सोमनाथ गिरी,सोमनाथ पगार,शिवनाथ हुजरे आदींसह शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथे संविधान मंचाची स्थापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज**

गोंदिया : शहराला लागून असणाऱ्या नंगपूरा-मुर्री येथील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा येथे आज सकाळी ११.२० वाजता संविधान मंच स्थापन करण्यात आले.

यावेळी शाळेतील मुख्याध्यापक रविशंकर इठुले यांच्या अध्यक्षतेखाली शाळेतील शिक्षक नीता भलमे, प्रदिप ढवळे, साधना पारधी, अस्मिता तेलंग, मुन्नाभाई नंदागवळी, कार्तिक शहारे, स्वाती राणा, अर्चना चव्हाण आदी उपस्थित होते.

याप्रसंगी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय ग्रंथ भारतीय संविधान या प्रतीची पुजा करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भारतीय संविधान प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. या निमित्ताने शाळेतील विद्यार्थी यांच्यासाठी संविधान प्रश्र्न मंजूषा स्पर्धा वर्ग सहावी ते दहावी करिता घेण्यात आली. यामध्ये तीन समुह पाडण्यात आले. जयभीम समुह, भीम सैनिक समुह व भीम शक्ती समुह या समुहापैकी भीम सैनिक समुह हा विजयी झाला. यामध्ये अनामिक दुर्योधन, हेमंत लागे, अंश राऊत, असित दुवे व रौनक अंबादे हे विजयी झाले. यांना व सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे. या स्पर्धेचे आकर्षक निवेदन माध्यमिक शिक्षक मुन्नाभाई नंदागवळी यांनी केले. नंतर सर्व वर्गांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

